प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के
एम.एस्सी., पीएच.डी.
कुलगुरू
Prof. (Dr.) D. T. Shirke
M.Sc.,Ph.D.
Vice Chancellor

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC
शिवाजी विद्यापीठ,
विद्यानगर, कोल्हापूर - ४१६ ००४.
SHIVAJI UNIVERSITY,
Vidyanagar, Kolhapur - 416 004.

दूरध्वनी (कार्या.) : (०२३१) २६०९०६०
निवास : (०२३१) २६०९०५३
Tel. (Office) : (0231) 2609060
Resi. : (0231) 2609053
E-mail : vcoffice@unishivaji.ac.in
Web : www.unishivaji.ac.in

अ.शा.क. व्हीसी / 1103 / 9
दिनांकः 17 नोव्हेंबर, 2022

प्रिय श्री खराडे यांना,

शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनी "संलग्न महाविद्यालयातील गुणवंत शिक्षक व गुणवंत प्रशासकीय सेवक" ही पारितोषिके दिली जातात, हे आपणांस विदित आहेच.

आपणांस कळविण्यास अत्यंत आनंद होतो की, विद्यापीठाच्या हीरक महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त "संलग्न महाविद्यालयातील गुणवंत सेवक पुरस्कार – 2022" देण्यासाठी गठीत केलेल्या निवड समितीने एकमताने आपल्या नावाची शिफारस केलेली आहे.

महाविद्यालयात आपण आजवर अत्यंत प्रामाणिकपणे सेवा केलेली आहे. आपल्या सेवा कालावधीमध्ये केलेले काम विशेष प्रशंसनीय आहे. या सेवा कालावधीत महाविद्यालयाप्रती आपली निष्ठा, सहका–यांविषयी आदर, आत्मियता, सचोटी, कार्यतत्परता, वक्तशीरपणा व सहकारी वृत्ती या प्रमुख बाबी विचारात घेऊन समितीने या गौरवासाठी आपली निवड केली आहे. आपल्या निवडीबद्दल आणि या उल्लेखनीय बहुमानाबद्दल मी आपले हार्दिक अभिनंदन करतो.

शुक्रवार, दि 18 नोव्हेंबर 2022 रोजी सकाळी 9.30 वाजता पुरस्कार वितरण सोहळा विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात आयोजित करण्यात आला असून सदरहू कार्यक्रमास उपस्थित राहून आपण "संलग्न महाविद्यालयातील गुणवंत सेवक पुरस्कार" स्वीकारावा, ही विनंती.

आपले पुनश्च हार्दिक अभिनंदन!

आपला,
(दिगंबर शिर्के)

श्री दत्तात्रय जगन्नाथ खराडे,
ग्रंथालय परिचर,
प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर,
ता. कोरेगांव, जि. सातारा


शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
Estd. 1962
महाविद्यालयीन गुणवंत सेवक गौरव सन २०२२
श्री. दत्तात्रय जगन्नाथ खराडे

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

## Diamond Jubilee Foundation Day

# Certificate

*This Certificate of Excellence is issued to* ***Shri. Dattatraya Jagannath Kharade,*** *Library Assistant, Prof. Sambhajirao Kadam Mahavidyalaya, Deur for being honoured as the* ***'Best Employee'*** *in the colleges affiliated to the University year 2022.*

## हीरक महोत्सवी वर्धापन दिन

# प्रशस्तिपत्र

**श्री. दत्तात्रय जगन्नाथ खराडे,** ग्रंथालय परिचर, प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर यांना सन २०२२ चे महाविद्यालयीन **गुणवंत सेवक** म्हणून निवड झाल्याबद्दल हे प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात येत आहे.

१८ नोव्हेंबर, २०२२

| Ag. Registrar | Pro Vice-Chancellor | Vice-Chancellor |
|---|---|---|
| प्रभारी कुलसचिव | प्र-कुलगुरु | कुलगुरु |

9 Certificate 2022 Gunvant 9


राजमाता जिजाऊसाहेब सभागृह
कोल्हापूर

।।श्री वंदनेश्वर प्रसन्न।।

# श्री. शिववंदनेश्वर प्रतिष्ठाण

किल्ले चंदन-वंदन-प्रांत महाराष्ट्र राज्य

नोंदणी क्रं. महा/१६७६६/सा दि. १९/०६/२०१९

चला राखु दुर्ग बनवु महाराष्ट्र स्वर्ग

## सन्मानपत्र

प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर राष्ट्रीय सेवा योजना आणि इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २१ फेब्रुवारी २०२० रोजी दुर्ग श्री वंदनगड, ता. वाई , जि. सातारा या गडावर दुर्ग संवर्धनाचे कामा करिता महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, कार्यक्रमाधिकारी व इतिहास विभागातील विद्यार्थी आणि प्राध्यापक यांनी श्रमदान केले आणि आपल्या श्रमदानातून महाराष्ट्राचा व हिंदवी स्वराज्याचा वारसा असलेले किल्ले वंदनगड संवर्धनासाठी अमूल्य असे योगदान दिले. या प्रित्यर्थ हे सन्मानपत्र त्यांना आज मिथी मार्गशीर्ष शु।८ शके १९४४, दिनांक १ डिसेंबर २०२२ रोजी किल्ले वंदनगड विजय उत्सवानिमित्त सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे.

श्री शिववंदनेश्वर प्रतिष्ठान
रजि. नं. महा/१६७६६/सा
दि. १९.०६.२०१९
चंदन-वंदन प्रांत, सातारा, महाराष्ट्र राज्य

दैनिक ऐक्य, सातारा.
८ रविवार, दि. ४ डिसेंबर २०२२

# श्री शिववंदनेश्वर प्रतिष्ठानचे कार्य कौतुकास्पद : एकबोटे



मिरवणुकीत सहभागी झालेले नागरिक.

▲ पिंपोडे बुद्रुक, दि. ३ : श्री शिववंदनेश्वर प्रतिष्ठानचे कार्य खरोखरच कौतुकास्पद आहे असे गौरवोद्‌गार मिलिंद एकबोटे यांनी किल्ले चंदन वंदन गडावर विजयोत्सव कार्यक्रमप्रसंगी काढले.

३६१ वर्षांपूर्वी प्रतापगडाच्या पायथ्याशी मार्गशीर्ष शु. सप्तमी म्हणजे १० नोव्हेंबर १६५९ रोजी याच दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखानाला ठार मारले होते. अफजलखान वधाच्या दुसऱ्याच दिवशी मार्गशीर्ष शु. अष्टमीला छत्रपतींनी क्षणाचाही विलंब न लावता किल्ले चंदन वंदन गडावर भगवा फडकवला आणि आदिलशाहीच्या ताब्यात असणारे पन्हाळ्यापर्यंतचे सर्व किल्ले स्वराज्याच्या ताब्यात घेतले.

किल्ले चंदन वंदन विजयाची आठवण म्हणून दरवर्षी विजयोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. हाच विजयोत्सव दि. १ डिसेंबर रोजी हजारोंच्या संख्येने शिवप्रेमींच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या व धर्मवीर संभाजी महाराज यांच्या पालखीची भेट पठारावर झाली. जयजयकार करीत संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. वाजतगाजत दोन्ही पालख्या गडावर नेण्यात आल्या. गडावर आरती आणि मिरवणूक काढण्यात आली.

छत्रपती शंभूराजे परिवार, धर्मवीर गड प्रतिष्ठान, वैराटगड प्रतिष्ठान, जय शंभूराजे परिवार, गड झुंजार मावळा प्रतिष्ठान, मोडी अभ्यासक सह्याद्रीचे शिलेदार, शहीद भगतसिंग गर्ल्स ट्रेनिंग स्कूल, सातारा, शिवराय ट्रेकिंग ग्रुप कराड, संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर, शिवशंभू संघटना, भटकंती सह्याद्रीची परिवार, वाई यांचा शाल, श्रीफळ, प्रशस्तिपत्र, प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.